"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

# महाराष्ट्र शासन

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय**

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१

दुरध्वनी क्रं. ०७१२-२५५५६७३ - फॅक्स क्रं ०७१२-२५५०६७५

**Email Id :-** apccfprotection@maharashtra.gov.in, ccfforestregulation@yahoo.com

**तात्काळ/ई-मेलद्वारे**

क्रं.अ.प्र.मु.व.स.(सरंक्षण)/कक्ष-२५/मालकी/प्र.क्र.१७३/ ५५/२०२४-२५
नागपूर ४४० ००१, दिनांक०७/०६/२०२४

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादे.), (सर्व)
वनसंरक्षक (प्रादे.), (सर्व)

**विषय:**-वन उपजांच्या वाहतूक परवानाकरीता NTPS प्रणाली राज्यात लागू करण्याबाबत.

**संदर्भ:**-शासन पत्र क्र.टिआरएस-01/2024/प्रक्र.11/फ-6, दि.२९/०२/२०२४

संपुर्ण देशात वन उपजांच्या निर्गतीसाठी आवश्यक वाहतूक परवाना जारी करण्याकरीता "एक राष्ट्र-एक पास" या तत्वावर केंद्र शासनाने NTPS (National Transit Pass System) ही प्रणाली विकसित केली आहे. तसेच महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ मध्ये अधिसूचना क्रमांक TRS-११/२०२१/C.R.३१५/F-६, दिनांक ०५/१०/२०२३ अन्वये राज्यात राष्ट्रीय ट्रान्सिट पास प्रणाली (NTPS) कार्यान्वित करण्याबाबत सुधारणा करण्यात आली आहे.

२.० राज्यातील सर्व तपासणी नाकावरील कार्यरत वन कर्मचारी, वाहतूक परवाना जारी करणारे प्राधिकारी/वन परिक्षेत्र अधिकारी व इतर वापरकर्त्यांचे या प्रणालीमध्ये Mapping करण्यात आलेली आहे. NTPS या प्रणालीमध्ये ऑनलाईन परवाना शुल्क स्विकारण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्रात "वनसंरक्षक (वन विनियमन), नागपूर" या नावाने ऑनलाईन परवाना शुल्क स्विकारण्याची सुविधा ICICI Bank Payment Gateway System शी संलग्न असल्यामुळे ICICI बँकेमध्ये चालू खाते उघडण्यात आले आहे.

३.० **NTPS (National Transit Pass System) प्रणाली महाराष्ट्र राज्यात दिनांक १२/०६/२०२४ पासून लागू करण्यात येत असून सुरवातीला वनउपजाच्या आंतरराज्यीय वाहतूक परवाना करीताच सदर प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे** व राज्याअंतर्गत वनोपजाच्या वाहतूकीसाठी सध्या वापरात असलेली ई-टिपी प्रणाली सुरु राहील व आंतरराज्यीय वाहतूक परवाना करीता जुनी ई-टिपी प्रणाली वरील सेवा दिनांक १२/०६/२०२४ पासून बंद करण्यात येईल. NTPS (National Transit Pass System) प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

- वन उपजांच्या आंतरराज्यीय वाहतूक परवानाकरीता NTPS (National Transit Pass System) प्रणाली राज्यात दिनांक १२/०६/२०२४ पासून लागू करण्यात येत आहे.
- NTPS (National Transit Pass System) सेवा **https://ntps.nic.in** या Portal वर उपलब्ध होणार आहे.
- वन उपजांच्या राज्याअंतर्गत वाहतूक परवानाकरीता पुढील आदेशापर्यंत जुनी ई-टिपी प्रणाली कार्यान्वित राहील.
- NTPS (National Transit Pass System) प्रणाली राज्यात लागू करण्याकरीता सर्व खरेदीदार, शेतकरी तसेच इतर वापरकर्ते किंवा संबंधित संस्था यांच्यात जनजागृती करुन NTPS (National Transit Pass System) प्रणालीच्या वन उपजांच्या आंतरराज्यीय वाहतूक परवानाकरीता वापरण्याबाबत सुचित करावे.
- NTPS (National Transit Pass System) प्रणाली वापरण्याबाबत खरेदीदार,, शेतकरी तसेच वापरकर्ता किंवा संबंधित संस्था व क्षेत्रीय कर्मचा-यांना अडचणी होत असल्यास या कार्यालयास कळविण्यात यावे. जेणेकरुन या कार्यालयातून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण),म.रा.नागपूर या कार्यासनाद्वारे प्रशिक्षण आयोजित करता येईल.
- NTPS (National Transit Pass System) प्रणाली राज्यात दिनांक १२/०६/२०२४ पासून लागू होत असल्याबाबत स्थानिक स्तरावर वृत्तपत्रातून व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

४.० NTPS (National Transit Pass System) प्रणाली महाराष्ट्र राज्यात दिनांक १२/०६/२०२४ पासून लागू करावयाचे असल्याने तातडीने कार्यवाही करावी.

(शैलेश टेंभुर्णीकर)
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमख)
महाराष्ट्र राज्य

प्रतिलिपी:- प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीकरीता सादर.

प्रतिलिपी:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), म.रा. नागपूर यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषित.